महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

=================================================================

जावक क्रमांक – ४१०२/६५ दिनांक :- १५ ऑक्टोबर, २०२४

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा मुख्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

मुंबई, दि. १५ ऑक्टोबर, २०२४ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती अर्थात वाचन प्रेरणा दिनानिमित्त वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात 'अचूक लिहू या मराठी' या विषयावर भाषा अभ्यासक श्री. वैभव चाळके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा आज उत्साहात पार पडली.

या प्रसंगी श्री. चाळके म्हणाले की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषकांची जबाबदारी आणखी वाढली आहे. भाषा अभिजात झाली असली तरी मराठी भाषेचा दैनंदिन व्यवहारात आपण किती सजगपणे वापर करतो हे महत्त्वाचे ठरणार आहे. अभिजात झालेली मराठी ज्ञानभाषा होणे गरजेचे आहे. मराठी भाषेला ज्ञानभाषा करण्यासाठी सर्वांनी भाषा वापरत राहिले पाहिजे. आपली भाषा आपल्याला नियमांप्रमाणे लिहिता आली पाहिजे. प्रशासकीय कामकाजात लेखन करताना मराठी लेखन कोश, शुद्धलेखन ठेवा खिशात, मराठी विश्वकोश, मराठी शब्दकोश अशा पुस्तकांचा संदर्भासाठी वापर करण्याचे आवाहनही श्री. चाळके यांनी यावेळी केले.

म्हाडाच्या सचिव श्रीमती नीलिमा धायगुडे यांनी दैनंदिन प्रशासकीय कामकाज मराठीत होत असल्याने अचूक मराठी लेखन अत्यंत गरजेचे आहे. प्रशासकीय लेखन करताना अचूक शब्दांची निवड करणे, सुयोग्य शब्दरचना करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या कार्यशाळांचा कर्मचाऱ्यांना निश्चितच प्रशासकीय कामात उपयोग होणार आहे. मराठी भाषा व्याकरण, शुद्धलेखन याची उजळणी या माध्यमातून झाल्याचे श्रीमती धायगुडे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला 'म्हाडा'चे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुख्य अभियंता श्री. महेश जेस्वानी, मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे, कार्यकारी अभियंता श्री. नीलेश मडामे, जनसंपर्क अधिकारी तथा मराठी भाषा अधिकारी श्री. हेमंत पाटील, उपअभियंता श्री. अभय कुलकर्णी आदींसह म्हाडातील अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial



